बी. ए. तृतीयवर्ष
पेपर – IX

# आर्थिक विचाराचा इतिहास

## Unit 1st

# आधीचा कालखंड

## [Early Period]

प्रा. डॉ. स्वाती कुरमे
अर्थशास्त्र विभाग
बळीराम पाटील महाविद्यालय किनवट

## व्यापारवाद [Mercantilism ]

युरोपमध्ये वेगवेगळया राष्ट्रात 15 व्या शतकापासून ते 18 व्या शतकापर्यंत अनेक विचारवंतानी विचार मांडले मध्य युगाच्या शेवटापर्यंत युरोपमधील अनेक राष्ट्रामध्ये आर्थिक समस्या निर्माण झाल्या हया समस्या कशा सोडविता येतील या सबंधी युरोपीयन राष्ट्रातील व्यापार , उद्योगपती राजकारणी, अधिकारी , मुत्सदी, प्रशासक , राजपूत यांनी आपआपल्या देशात विविध दस्ताएवजात ,कागदपत्रात , पुस्तकात अर्थिक समस्या व आर्थिक् व्यवहाराबाबत. आपआपले मत मांडले . सुचना केल्या धोरणे सुचविली हवा सगळया विचारात एक वाक्यता होती हे विचार ज्यानी मांडले त्यांना व्यापारवादी असे म्हटले जाते तर त्यांनी गुंफलेल्या विचारांना व्यापारवादी विचारसरणी किंवा व्यापारवाद असे म्हणतात.

**व्याख्या :-**

1) **रॉबर्ट लॅक्च्मन :-** व्यापारवाद म्हणजे मार्ग रोखण्याच्या मध्ययुगीन विचाराविरुध्द व रुढी विरुध्द केलेले युध्द होय.

2) **श्लॉमर :-** व्यापारवाद म्हणजे केवळ राज्याची निर्मिती किंवा व्यापारवाद म्हणजे आर्थिक बाजूने राज्याची निर्मिती होय.

## व्यापरवादाच्या उदयाचीकारणे

1) धर्म सुधारणा चळवळ
2) विद्येचे पुरुज्जीवन
3) सरंजामशाही शेवट
4) सागरी मार्गाचे शोध
5) पैशाचा वापर
6) बुध्दीवादी चळवळ
7) मुक्त कामगार वर्ग
8) अनियंत्रित राजेशाहीचा पुरस्कार
9) राष्ट्राच्या खर्चातील वाढ
10) मानवतावादी दृष्टीकोन

## व्यापारवादाची मुख्य तत्वे / वैशिष्टये

1) देशाला आर्थिक दृष्टया समर्थ बनविणे
2) मौल्यवान धातू व संपत्तीचा संचय करणे.
3) अनुकूल व्यापारवाद व उद्योगाचे नियंत्रण करणे
4) अनियंत्रित राजेशाही प्रस्थापित करणे

# निसर्गवाद [ Physicracy]

निसर्गवाद ही एक विचारसरणी आहे ती कोण्या एका विचारवंतानी मांडलेली नाही ती अनेक विचारवंतानी अर्थतज्ञानी व लेखकांनी मांडलेली आहे. निसर्गाने देणगी म्हणून दिलेल्या शेती व्यवसायावर आधारित अशी विचारसरणी म्हणजे निसर्गवाद होय. फ्रान्समधील लेखक, विचारवंत आणि अर्थतज्ञ यांनी व्यापाराविरुध्द मांडलेले विचार म्हणजे निसर्गवाद होय.

**व्याख्या :**

1) **प्रा.एच.एल.हॅने :-** निसर्गवाद म्हणजे फ्रेंचानी व्यापारवादाविरुध्द उभारलेले बंड होय.
2) **दुपोदन मुरु:-** निसर्गवाद म्हणजे नैसर्गिक् व्यवस्थेचे किंवा नैसर्गिक पध्दतीचे शास्त्र होय.

# निसर्गवादाच्या उदयाची कारणे

1) भ्रष्ट राज्यकारभार
2) फ्रान्सच्या शेती क्रांतीचा प्रभाव
3) इंग्लडमधील शेती क्रांतीचा प्रभाव
4) भरमसाठ जुलमी कर
5) ज्ञानाच्या क्षेत्रातील बद्दल
6) व्यापारवाद विरोधी विचार

# निव्वळ उत्पन्न किंवा उत्पादन [ Net product]

उत्पादनाच्या प्रक्रियेत बरीचशी साधणे नष्ट होतात ही नष्ट झालेली एकुण साधने एकुण उत्पान्नातून वजा केल्यास जो उत्पादनाचा हिस्सा शिल्लक राहतो त्यास निव्वळ उत्पादन असे म्हणतात.

1) संपत्तीची निर्मिती शेतीमधूनच होते.
2) शेती हा उत्पादनाचा असा भाग आहे की तो वाढावा निर्माण करतो.
3) शेतीमध्ये मुठभर पेरले तर पोतभर उगवते

# Thank You